# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २१/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ एप्रिल, २०१७

प्रति,
आयुक्त,
भिवंडी-निजामपूर, मालेगाव व पनवेल महानगरपालिका

विषय :- ३ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका- २०१७
मतदार यादी तयार करण्याबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. २२/३/२०१७ चे पत्र.
२) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.२४/३/२०१७ चे पत्र (पनवेल महानगरपालिकेबाबत)

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन क्र. १ च्या पत्रान्वये भिवंडी-निजामपूर व मालेगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता दि. १८ एप्रिल, २०१७ हा प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक म्हणून निश्चित करण्यात आला आहे. तर संदर्भाधीन क्र. २ च्या पत्रान्वये पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता दि. २१ एप्रिल, २०१७ हा प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक म्हणून निश्चित करण्यात आला आहे.

२. तथापि, मतदार याद्या निर्दोष करण्याकरिता लागणारा अधिकचा कालावधी विचारात घेता उपरोक्त दिनांकास प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करण्यात येऊ नयेत. याबाबतची सुधारीत तारीख लवकरच निश्चित करुन देण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- १) जिल्हाधिकारी, ठाणे, रायगड व नाशिक
२) संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग.
३) निवड नस्ती.